# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

**सावित्रीबाई फुले माता व बाल मनपा रुग्णालय,मालाड (पुर्व)**

**रिध्दी गार्डन मनपा प्रसूतीगृह,पी/पुर्व विभाग**

**जाहिरात क्र. एचओ/344/एचपीएमबीएच दि.22.10.2026**

विषय:- पी/पुर्व विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत सावित्रीबाई फुले माता व बाल मनपा रुग्णालय (रिध्दी गार्डन मनपा प्रसूतीगृह),मालाड पुर्व,येथे सोनोजॉजिस्ट पॅनलवर निवड करण्याबाबत.

पी पूर्व विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत सावित्रीबाई फुले माता व बाल महानगरपालिका रुग्णालय, रिध्दी गार्डन महानगरपालिका प्रसुतिगृह, मालाड(पूर्व) येथील आंतररूग्णांच्या शस्त्रकीयेकरिता सोनोलॉजिस्ट यांची पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक सोनोलॉजिस्ट यांची परिपत्रक क्र. एचओ/19816/आस्था-2 दि. 13.12.2025 अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार दि. 23.10.2026 ते दि. 04.11.2026 पर्यंत ( साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सोनोलॉजिस्ट पॅनल वरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता**

1. उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी/ पदविका/ डीएनवी धारण करणारा असावा.
2. पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर 1 वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
3. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
4. अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र/ नुतनीकरण आवश्यक.

**सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती**

1. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची वयोमर्यादा 65 वर्षापर्यंत राहिल.
2. प्रत्येक प्रसुतिगृहात सोनोलॉजिस्ट पॅनलमध्ये कमीत कमी दोन तज्ञ असावेत.
3. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्राकार पध्दतीने शस्त्रकिया करिता बोलवण्यात यावे.

4. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह/ रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.

5. सोनोलॉजिस्ट नियमित शस्त्रकियेबरोबर तातडीच्या शस्त्रकियेकरिता सुध्दा उपलब्ध असावेत.

6. एकूण 3 सोनोलॉजिस्ट निवड पॅनलवर केली जाईल . सोनोलॉजिस्ट यांची निवड प्रतिक्षायादी करिता केली जाईल.

7. पॅनलवर सोनोलॉजिस्ट निवड करण्याचे अंतिम निर्णय कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक खाते यांचे राहील.

8. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांना देण्यात येणा-या सुधारित दराचा तपशिल

| **सोनोलॉजिस्ट पॅनल मानधनाचा तक्ता** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **सुविधेचे नाव** | **प्रस्तावित मानधन** |
| 1 | सोनोलॉजिस्ट सेवा ( सर्वसाधारण सोनोलॉजली) | प्रत्येक सोनोग्राफी करिता रु 250/- |
| 2 | सोनोलॉजिस्ट सेवा ( अनमोली स्कॅन /कलर डॉपलर/ 2 डी इको) | प्रत्येक स्कॅन करिता रु 500/- |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक सोनोलॉजिस्ट यांनी वैद्यकीय अधिकारी सावित्रीबाई फुले माता व बाल मनपा रुग्णालय (रिध्दी गार्डन मनपा प्रसूतीगृह),मालाड पुर्व, यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व सहकागदपत्रे **वैद्यकीय अधिकारी, सावित्रीबाई फुले माता व बाल मनपा रुग्णालय (रिध्दी गार्डन मनपा प्रसूतीगृह),न्य वेलटांईन अर्पाटमेंट,रिध्दी गार्डन कॉम्पलेस,दिंडोशी मालाड पुर्व, मुंबई-400097** कार्यालयात दि. 23.10.2026 ते दि. 04.11.2026 पर्यंत सकाळी 10.00 वा ते सायंकाळी 18.00 वा पर्यंत पोचतील याची दक्षता घ्यावी.

सही- 23.10.2026

**वैद्यकीय अधिकारी**
**सावित्रीबाई फुले माता व बाल मनपा रुग्णालय**
**(रिध्दी गार्डन मनपा प्रसूतीगृह),मालाड पुर्व**